# प्रकरण ६

# गणेश चौधरी यांचे 'नागवा'चे अध्ययन

मराठी साहित्यात अत्यंत वेगवेगळ्या पातळीवर म्हणजे रुढार्थाने सर्वसामान्य पांढरपेशीय समाजाला प्रचंड हादरे देणारे 'नागवा' हे वेगळे व वैशिष्ट्यपूर्ण आत्मकथन साहित्यात आले आणि मराठी साहित्यात एक वेगळा ठसा उमटवला आहे. त्यामुळेच गणेश चौधरी यांच्या 'नागवा' या साहित्यकृतीचे अध्ययन करताना त्यामध्ये वेगळेपण जाणवते. 'नागवा' हे आत्मकथन एका मनाचे रेखाटलेले चित्र आहे.

## कथानक -

'नागवा' आत्मकथनात लेखकाच्या त्या त्या वेळेची मनस्थिती आणि वैशिष्ट्यपूर्ण मनोरुग्णतेचा इतिहास यातून त्यांनी सांगितलेला आहे. म्हणजेच 'मनोदुभंगतेच्या' खुणा त्यांच्या 'नागवा' या आत्मकथनात दिसून येतात. या आत्मकथनाचा अभ्यास करत असताना या साहित्यकृतींची बांधनी त्याचा आराखडा याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. मुखपृष्ठावरती संपूर्ण काळा रंग आहे हा रंग प्रवृत्तीचे, दु:खाचे-नैराश्याचे, विकृतीचे दर्शन घडवितो. आणि तिथे एका नग्न व्यक्तीची प्रतिकृती आहे आणि त्यांच्या पाटीवर लाल रंगाच्या स्वरुपात शर्टची आकृती आहे. यावरुन आपल्याला या आत्मकथनाचा आशय समजतो. म्हणजेच त्यांच्या विकृत, द्वंद, काचेचं नग्न मनाला झाकण्याचा स्वत:च केलेला असफल प्रयत्न आहे.

'नागवा' हे आत्मकथन गणेश चौधरी यांनी प्रिय भैया उपासनी व सौ. शारदा वहिनीस अर्पण केले आहे. त्याचप्रमाणे प्रस्तावना मराठीतील दिवंगत थोर साहित्यिक वा. रा. सोनार यांनी दिली आहे. 'नागवा' या पुस्तकाबद्दल मराठी साहित्यात त्यांनी बरेच ऐकले होते. त्याचप्रमाणे त्यांच्या लेखनाबाबतचे कुतूहल हे थेट त्यांच्या जीवनाशी वाचकाला नेत असल्याने 'कै. गणेश चौधरी' या व्यक्ती विषयी अधिक उत्सुकता निर्माण होणे स्वाभाविक आहे. त्याबरोबर ते प्रस्तावनेत सांगतात की, "गणेश चौधरी या एका वेड्या वादळाची परिणती मृत्युने थांबण्यात कधीच होत नसते. अनेक वादळांना जन्म देणारे हे महावादळ असल्याचा प्रत्ययच अशा लेखनातून न दिला तर नवल नाही"[१] वा. रा. सोनार यांनी केलेल्या विवेचनावरुन गणेश चौधरी हे महावादळ आहे. हे त्याच्या आत्मकथनावरुन


BARR. ... LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

स्पष्ट दिसून येते. हे लेखन त्यांनी दुसऱ्या मनोरुग्णांना उपयोगी पडावे यासाठी ते लिहिताना दिसतात.

'नागवा' या पुस्तकामध्ये एकूण १७ लेख आहेत. यामधून त्यांचे बालपण, शिक्षण तसेच त्यांना होणारा भास, भ्रम सांगितला आहे. या संदर्भात 'आकांक्षा' मासिकामध्ये सांगतात की, ''ज्या प्रकरणांमधून जाणीवेच्या निखळ रुपातून आठवणींच्या प्रदेशात सुव्यवस्थितपणे ते प्रवेशतात तेथे गद्य वर्णनातील कौशल्याची परिसीमा ते गाठताना दिसतात. प्रकरण १४ ते १७ या दृष्टीने अभ्यासण्यासारखी आहेत. आपल्या मनोविकृतीतून जन्मेलेल्या दुःखाला, वेदनेला अपरिहार्य स्वीकृतीतून आलेल्या संयमातून मांडताना जो कलात्मक आणि काव्यात्मक आकार गद्याला प्राप्त होतो; त्यानं वाचकाला दुःखाचा गहिरा अनुभव प्राप्त होतो. गद्याच्या काव्यात्मकतेने दुःखाचे सघन रुप पहावयास मिळते.''[२] म्हणजेच गणेश चौधरींनी जाणीवेत लेखन करताना त्यांच्यातील लेखक तर दिसतो. त्या बरोबर त्यांना दुःख सांगताना अत्यंत कलात्मक स्वरुपात सांगितले आहे. 'नागवा' हे आत्मकथन फ्लॅशबॅक पध्दतीने लिहिलेले आहे. आणि हे आत्मकथन 'मी'च्या भोवती केंद्रीत झालेले आहे. येथे आपल्याला साहित्याचे गुणविशेष ठळक पद्धतीने दिसून येतात. त्याचप्रमाणे 'नागवा' या पुस्तकाचे मलपृष्ठ या आत्मकथनाचा शेवटचा भाग/टप्पा आहे. यामध्ये संपूर्ण पांढरा रंग आहे. चौधरींच्या जीवनातील वादळ येऊन गेल्यानंतर निर्माण झालेली ही शांतता आहे. त्यावरती चौधरी यांचे छायाचित्र आहे. त्यावरुन असे दिसून येते की संपूर्ण वेड संपून गेले आहे. जीवनात आत्मसमाधान गमावून बसलेला आणि त्या असमाधानाची जाणीव मनामध्ये कोठेतरी सलत असलेली दिसून येते असा पश्चाताप दग्ध कोणत्याही संकटाला सामोरे जाण्याचे मनोधैर्य असलेला असा तो दिसतो.

'नागवा' या साहित्यकृतीचा अभ्यास करताना जाणवते की आई-वडील भाऊ आणि नातेवाईकांची झालेली ससे होरपळ आणि कोर्टाचे सुरु झालेले चक्र याविषयी असे म्हणतात की, ''एका भाबड्या, दुदैवी जीवाची लोक विलक्षण शोकांतिका त्याच्या नित्याच्या जगण्यातील जाणिवेतील असहनीय दाह-धगधगती वेदना, नेणिवेतील राक्षसी वासना-विकारांचे दुःसह रुप साकारित या व्यक्तिमत्वाबद्दल अनेकांनी भरभरुन लेखन केलेले दिसते. त्यामध्ये ग. त्र्य. माडखोलकर, डॉ. य. वा. केळकर, नीलकंठ महाजन, वा.

रा. सोनार, म. वा. धोंड, दीपक घारे, भा. ज. कवीमंडन, यांच्या बरोबरच गणेश चौधरी स्मृतीदिन वा प्रासंगिक रुपाने भैया उपासनी, बाळकृष्ण सोनावने, प्रा. महेंद्र पाटील आदींनी वृत्तपत्रीय स्फू टलेखन केलेले आहे.''[३] चौधरी यांच्या नेणिवेतील जीवानाची दाहकता सर्वांनी वर्णन केली आहे. पण जितके त्रिवार सत्य स्वत:हा गणेश चौधरी लेखन करु शकतात. तेवढे कुणालाही करता येणार नाही हे ही तेवढेच सत्य आहे असे दिसून येते.

गणेश चौधरी यांचे आत्मकथन म्हणजे एका संवेदनाक्षम कवी, लेखक व कलावंताचे आहे. या संदर्भात असे विवेचक करतात की, ''हे आहे एका वेडातून स्वत:ला सावरण्यासाठी जगाशी झोंबी घेत, आव्हाने फेकीत जाणाऱ्या विकल मानसिक रुग्णाचे रुंदन. पश्चातापाच्या अखंड धगीत उरलेले आयुष्य धरताना नकोशा झालेल्या स्वत:ला स्वत:च्या रुपाने अव्हेरणे हे आहे. विलक्षण संवेदनाशील नात्यांचे अनुबंध जोपासू पाहणाऱ्या पण नियतीने आधीच चिंध्या केलेल्या मनाचे आक्रंदन शब्दांच्या मर्यादित आत्मक्लेष व्यक्त करण्याचे पार्थिव नि:संकोच प्रयत्न शरिरतेच्या क्षुधांचे खदखदते प्रांजळ गाणे मनालाच ग्वाही ठेवून केलेले निर्भिड गाऱ्हाणे''[४] गणेश चौधरी यांनी जाणिवेत आल्यावर अनेक बंधन घालून स्वत:च्या दु:खाचे गाणे ते गातात. पण येथे कोणताही स्वार्थ दिसून येत नाही. ते स्वत:च्या दु:खाची चिरफाड करतात. पण कुठेही वेदनेचा उल्लेख करत नाहीत. म्हणजेच गणेश चौधरी यांना आपल्या दुर्दैवाची कहानी रेखाटली आहे. आपल्या हातून वेडाच्या झटक्यात झालेल्या दु:खपूर्ण, दुर्दैवी घटनेचा आघात त्यांच्या मनाच्या नित्य साधारण अवस्थेत पश्चातापाचा प्रपातच होऊन त्यांना छळू लागला आहे. ही मनाची विकल अवस्था त्यांनी तुरुंगात एकाकी लिहून काढली आहे ही त्यांच्या मन:स्थितीची उघड दिलेली साक्ष आहे. प्रच्छन्न लेखनीचा हा एक अनुभव स्फोट आहे. यातून एक जाणवते की गणेश चौधरी सारखी माणसे कधी मरत नसतात ती साहित्याच्या स्वरुपात सदैव जीवंत असलेली आपल्याला दिसतात.

साहित्याच्या क्षेत्रात 'नागवा' या आत्मकथनाने आपले वेगळेपण सिद्ध केले आहे. तसेच या आत्मकथनांची सुरुवात करताना त्या पाठीमागचे प्रयोजन त्यांनी सांगितले आहे. म्हणजे जसे आठवेल तसं आपण येथे सांगणार आहोत अशी प्रांजळ ग्वाही येथे ते देतात.

त्या संदर्भात पहिल्या भागात सांगतात की, ''म्हणजे माझ्या वेड्या अवस्थेतील कालावधी? काय डोंबल सांगणार? घटना, प्रसंग वगैरे, वगैरे? सर्व शुन्य पण परवा सुखदेव म्हणाला, 'चौधरीसाब आप यहाँ आए थे न तो अपने अपने ही खयालमे रहते थे खानाही नही खाते थे। तो हमको बहोत दुख होता था। मेरी ही तो ड्युटी थी। मैने कई बार अपने हाथसे आपको खाना खिलाया।''[५] या विवेचनावरुन येथे काही ठिकाणी लोकांनी सांगितलेल्या आठवणी गणेश चौधरींनी नमूद केल्या आहेत. त्यांना वेडाच्या अवस्थेतील काही काही घटनांची आठवण आहे. ते येथे दिसून येते. भूतकाळातील आठवणी सांगतात म्हणजेच येथे लेखनास सुरुवात 'फ्लॅशबॅक' पद्धतीने झाली आहे.

'नागवा' या आत्मकथनात ते आपल्याला लहानपणीच्या आठवणी ही कथन करताना दिसतात. ते अवघ्या चार वर्षाचे असताना तेव्हाची आठवण ते सांगतात एक दिवस त्यांना आईजवळ जाऊ दिले जात नाही. त्याला क्लब मध्ये पाठवले जाते. तसे त्यांना क्लब मध्ये जाणे आवडेपण त्या दिवशी ते रडत होते. आईला भेटण्यासाठी ते तडफडत होते. जेव्हा ते क्लबमधून येतात व आईजवळ जातात तेव्हा त्यांना भाऊ झाल्याचे समजते. त्यांचा त्यांना खुप राग येतो. आईला त्याला फेकून देण्यास ते सांगतात. त्यांच्या भावाने त्यांना आज आधार दिलेला आहे. त्यांना राम होता आले नाही. पण त्यांच्या भावाने त्यांचा लक्ष्मणाप्रमाणे संभाळ केला होता. ते दुसरी शाळेतील आठवण सांगतात त्यांना शाळेत नवीन बेसीक शिक्षण सूतकताईचे सुरु झाले होते. या विषयी ते सांगताल की, ''सूतकताई वर्गाची स्मृती पौगंडावस्थेतील काळात त्यांना नेते त्याकाळातील प्राथमिक शिक्षण पद्धतीतील काही विशेष येथे ठळक होतात. वयात येऊ पहाणाऱ्या तारुण्याच्या उंबरठ्यावरील या मुलामुलींमध्ये शिक्षकांद्वारे अत्यंत काटेकोरपणे पाळले जाणारे शिस्तीचे कठोरबंधत ते लिहतात. तारुण्यसुलभ भावना अत्यंत अवेगाने आकलू पाहणाऱ्या या काळात मुला-मुलींमध्ये जाणीवपूर्वक अंतर राखणे अत्यंत अमानुष, क्रुर वाटते. त्याचवेळी त्यांची सुमीशी मैत्री जुळली सुमीच्या सुरेखपणाची वैशिष्ट्ये ते नमुद करतात. स्मृतीच्या त्या ओघातून अचानक आपल्या कुटुंबाच्या पारंपरिक प्रतिष्ठित प्रवाहाच्या वर्णनास लागतात. वाचकाच्या मनात मात्र सुमी आणि त्यांच्या स्नेहाचे धागे रेंगाळत रहतात.''[६] गणेश त्यांच्या लहाणपणीच्या आणखी आठवणी सांगत असताना आपल्याला एका वेगळ्याच काळात

घेऊन जातात जेथे मुला-मुलींची मैत्री ग्राह्य मानली जात नव्हती. आणि शिक्षकांच्या असलेल्या शिस्तीचे आणि दबावाचे दर्शन ते घडवतात.

पण तेवढ्यातच उत्साहाने ते दिवाकर विषयी बोलतात. दिवाकर निश्चितच पुढे नाव काढील व धाडसी आहे. आणि विशेष म्हणजे फार दयाळू अंत:करणाचा आहे. या सर्व बोलण्यानंतर ते आईला जीवनातील एक सत्य सांगतात. दोन दिवस सुखाचे दोन दिवस दु:खाचे आले तरी धीर धरला पाहिजे हे सांगतात. पण त्यावेळी या वाक्याचा अर्थावर त्यांनी विचार केला नाही. आणि खरोखरच चौधरींच्या बाबतीत तीसावे वर्ष धोक्याचे गेले होते.

गणेश चौधरींनी 'नागवा' आत्मकथनामध्ये ताई या विषयाचे आपले प्रेम व्यक्त केले आहे. ती सर्व काम उरकून अभ्यासासाठी बसलेली होती. त्यावेळी रात्री ते आईच्या प्रेमासाठी आसुसले होते, कुढत होते. आई शेतीचे काम संभाळण्यासाठी गावी राहत होती. त्यावेळी त्यांना वाटे शेती नको आई हवी आहे. त्यावेळी ताई गात असलेल्या गीता/कविता ते सांगतात.

''पोर खाटेवर मृत्युच्याच दारा
कुणा गरिबाचा तळमळे बिचारा
दुर आई राहिली कोकणात
सेविकेचा आधार एक हात.....''[७]

त्यावेळी त्या कविता कळण्याचं ते वय नव्हतं. पण ताई गाते आणि गाईडमधला अर्थ मोठ्याने वाचते त्या शब्दातून व्यक्त होणारे दु:ख तेवढे कळते. त्यावेळी ते रडत असल्याचे पाहून ताई त्यांना आईच्या मायेने समजावते. तेव्हा त्यांना समजले नव्हतं. पण आजं कळतंय, हुंदका फुटण्याआधी तिला कसं कळलं. त्यानंतर ते सांगतात आई-बाबा करतात ते आपल्यासाठीच करत आहेत. आपल्यासाठी ते इतके पळत आहेत. अशी त्या समजूत काढतात. यानंतर त्यांना आठवतो तो ताईचा अकस्मित मृत्यु, आणि त्यावेळी त्यांनी मृत्यु विषयी प्रथमच विचार केला. आई बांबाच्या जवळ नव्हती तर माजघरात ताईच्या शेजारी बसली होती ते ताईला भेटण्यासाठी जातात त्यावेळी सुलूताई त्यांना झोपण्यासाठी पाठवते. पण त्यांना मध्यरात्री अचानक जाग येते. त्यावेळी त्यांना भयानक स्वप्न पडले होते. त्या स्वप्नात ताई वारली हे पाहून त्यांना जाग आली आणि खरंच आई प्रमाणे प्रेम करणारी

ताई त्यांना आज सोडून गेली होती. पण ते आज ही तिच्या आजाराविषयी शंकाच व्यक्त करतात. तीचा आजार आज ही त्यांना समजला नाही. ताई ही आईच्या प्रेमाची उणीव भरुन काढत होती. ताईच्याविषयी सांगतात की, ''आपल्या बहीणीच्या सुख-दु:खातील आपला एक वाटेकरी हरपल्याची जाणीव, तिची वेदना, त्याबरोबच 'भास' या प्रकारचा लक्षणाचा मागोवा बालपणापर्यंत येथे मागे येतो व 'सदोष मेंदुरचना' या कारणालाही बळकटी मिळते.''[८] गणेश चौधरींचे आपल्या बहिणीविषयी व्यक्त होणारे प्रेम दिसते. आपले दु:ख वाटून घेण्यासाठी हरपलेला हा वाटेकरी होता. याची खंत आज ही त्यांना होते. त्यानंतर ताई वारल्यानंतर प्रथमच आजी घरी आली. त्यांना शहरी शाळाचं आकर्षण नव्हते. त्यांना गावच्या शाळेत शिकायंच होत. आई-वडिलांच्या जवळ राहून त्यांना शिक्षण घेण्यात आनंद होता. पण बाबांच्या प्रतिष्ठेमुळे सर्वांचे त्यांचेकडे फाजील लक्ष होते. 'तुला हे शोभत नाही' किंवा 'काही खास अपेक्षा होत्या' त्यामुळे ते दबले जात होते.

लहाणपणापासून मनाविरुद्ध जगत होते. इतर मुलांप्रमाणे खेळले नाहीत, खोड्या काढल्या नाहीत. किंवा जे मनात येईल तसे हट्ट केले नाहीत. त्यांनी आपल्या मनाला लहाणपणापासूनच दडपून ठेवले होते. आणि त्याचमुळे त्यांच्या मानसिक भावभावनांचा उद्रेक होण्यास सुरवात झाली. त्यांना वेड लागले व हे वेड नागपूरला मनोरुग्णलयात बरे झाले. पण त्यांच्या मनात विचारांचे वादळ सुरु झाल्यावर त्यांचा स्वत:वर ताबा राहत नसे. स्वत:च स्वत:शी बोलणे, ओरडणे यामुळे होणारा त्रास आणि त्यातून निर्माण होणारी मानसिक अवस्था याचे चित्रण 'नागवा' या आत्मकथनात येते. या मनोरुग्ण अवस्थेत असताना त्यांनी गझल लेखन केले.

''दिलमें भडकके शोले क्यु उठते बार बार
क्यू रुबरु न ख्वॉबमे आते हो बार बार।
इतना तडप चुँका हुँ मै ये जानीये सनम
के अब दिल के तहके उपर उठने लगे गुब्बार।
अंजान समझा आपने ठुकरा दिया मुझे
देगे दूवॉये मरकेभी तुमको हजार बार। एक तेरे प्यारमें
दिलकी उम्मीदे टुटकर होती है छार छार।''[९]

येथे गणेश चौधरी जरी मानसिक स्थितीत लेखन करत असले तरी, त्यांचे आपल्या पत्नीवरील प्रेम आणि त्या नसल्यामुळे त्यांना जाणवणारे रिकामेपण दिसून येते म्हणजेच ह्या आठवणी कडू असल्यातरी त्यामध्ये कुठेतरी आपलेपणाची जाणीव आहे. या गझलावरुन त्यांच्या मानसिकतेची कल्पना येते. म्हणजेच गणेश चौधरींना शब्द, वाक्य, घटना, प्रसंग यांची अवाजवी चिरफाड करायची सवय बालपणापासूनच होती. ते म्हणतात आपल्या व बाह्य वातावरणात प्रत्येकामध्ये मला न कळलेला एक पडदा होता तो म्हणजे या काचेच्या मनाचा असलेला दिसतो. गणेश चौधरींना वाटे लोक आपल्या हालचालीवर, चालण्या, बोलण्यावर लक्ष ठेवत आहे. त्यांच्या मनामधील शब्दांचे खेळ, विचार, लोकांना समजत आहेत. यांचे उदाहरण म्हणजे शकू बद्दल त्यांच्या मनात येणारे विचार आणि सहकार्यांनी त्यांची केलेली मस्करी यामुळे त्यांना वाटे आपल्या मनातील विचार सर्वांना समजतात आपलं मन काचेचं आहे. नग्न मन म्हणजे वेडेपणाच आणि भ्रम, भास आभासाचा चकवाच आहे.

गणेश चौधरी हे मनोरुग्णालयामध्ये होते. त्यावेळच्या आठवणी सांगतात. मनोरुग्ण म्हणून तिथे असताना तिथले वातावरण, लोकांचे वेड, विकृती व त्यांची सततची बडबड चालत असे. त्यामध्ये एका मनोरुग्णाची आठवण ते सांगतात, ''साले कईबार आया हुँ पागल खाने में। लेकिने तेरे जैसा पगला नही देखा। तीन शादी हुँ तीन। कौन साला झाटे कहेता है मुझे। मै झाटे नही साले झाडे हुँ मै झाडे। किसनलाल झाडे। ये मेरा लवडा देख, देख साले, लवडा मेरा -''[१०] मनोरुग्णालयातील वेडे आणि त्यांची मानसिकता चौधरी सांगतात. या लोकांचा त्यांच्या मनावर परिणाम होतो. तसे पाहिले तर मनोरुग्ण असण्याची लक्षणे लहानपणापासूनच्या आठवणीवरुन दिसून येतात. त्यांना येथे वाटते की लोक आपल्याला काहीही बोलतात. या भ्रम, भासाचे रुपांतर हळूहळू संशयामध्ये होत गेले. त्यांना वाटे आपल्या पती-पत्नीच्या एकांतातील, सहवासातील बोलणे लोक ऐकत आहेत. त्यामुळे पत्नीला 'हाळू बोल' असे सांगत, कारण त्यांना लोकांचा संशय येत होता. यातूनच चोरटेपणा निर्माण झाला. आणि त्याच बरोबर व्यवसायामुळे काही अनैतिक वागता येत नव्हते. तेथे फक्त मनाचा कोंडमारा होत असे. हे प्रवाहा विरुद्धच पोहणं व लोकांनी 'चांगल' म्हणावं म्हणून अंतरात्म्याशी प्रतारणा करत जगत होते. आणि त्यामुळे

समाजापासून आपल्या व्यक्तीपासून दूर गेलो होतो. आता संवाद राहिला होता तो फक्त मनाशी त्यांना मनातल्या मनात 'बोलायची' सवय लागली होती. ते म्हणताता की, "मी सानेगुरुजी व्हायला चाललो होतो. महात्मा गांधी व्हायला निघालो होतो। किती वेडेपणा। जगात एक सारखा दुसरा होऊच शकत नाही। त्यापेक्षा गणेशला 'गणेश हो' म्हणून सांगितलं असतं तर फार फार चांगल झालं असतं!! ऊसान ऊस म्हणून अनं एरंडान एरंड म्हणूनच वाढल पाहिजे! ऊस कितीही चांगला असला तरी एरंडावर ऊसाच कलम केल्यानं एरंड आपले औषधी गूण गमावून खुरगटलेला मात्र राहिल! तेही जर कलम झालं तर! हीच गोष्ट म्हणजे मुंगीन पर्वत गिळावा अशी नाही, नाही का?"[११] गणेश चौधरी जाणीवेत आल्यावर यांची जाणीव होते. प्रत्येक व्यक्तीने आपल्या मध्ये असलेला सत्प्रवृत्तीची व विकृत प्रवृत्तीची जाणीव करुन घेऊन वागले पाहिजे. नाहीतर इडमध्ये साठलेल्या आपल्या आशा-आकांक्षाचा स्फोट होतो. हेच गणेश चौधरी सांगत आहेत.

मनोरुग्णलयातील अखेरच्या रात्रीविषयी गणेश चौधरी लिहितात त्या रात्री मधू आणि भोलेजी रात्रीच्या पाळीला होते. मधू त्यांना ब्रदर म्हणून बोलवत असे. या विषयी लिहितात की, "और ब्रदर एक बात मै मेंटली फिट हुँ इसलिए तो जेल भेजा जा रहा हूँ। मी आता पागल नाही, एकदम 'सर्टिफाईड' शहाणा आहे।"[१२] येथे गणेश चौधरी कागदपत्रावरुन आपण शहाणे आहोत. येथे त्यांच्या दु:खी, खिन्न मनाची स्थिती दिसते ते लिहितात त्या मध्यरात्री गोळ्या घेऊन ही झोप लागली नाही. मनोरुग्णालयात आल्या दिवसापासूनच्या सर्व आठवणी मनात जाग्या झाल्या होत्या आणि ती रात्र त्यांनी अशीच जागून काढली होती. पण प्रकरण १२ ते १७ यामध्ये त्यांच्या उफाळून येणाऱ्या वेड्या विकृतीचे व मानसिकतेचे दर्शन होते. या प्रकरणात त्यांची निरर्थक, अखंड चाललेली बडबड आणि त्या बोलण्याला कसलाच अर्थ नसतो. यावरुन त्यांची मनोरुग्ण असल्याचा त्यांना येत असलेल्या झटक्याचाही प्रत्यय येतो. या प्रकरणात ते सांगतात ते म्हणजे बेडकाचे ओरडणे तसेच मनी म्यॅवचे ओरडणे या विषयावर चाललेली त्यांची बडबड तसेच आपण मेल्यावर आपल्याच शरीराचे आपण पोस्टमार्टम कसे करु? याविषयीचे बोलणे किंवा का करायचे पोस्टमार्टम? याविषयीचे बोलणे, तसेच कुणाच्या ही बोलण्याकडे लक्ष नसने जर लक्ष दिलं तर मनावर वाढणारा भयंकर ताण आणि त्या कुणाचं बोलणं लवकर

लक्षात येत नाही ते येण्यापूर्वी कसल्याश्या अनामिक दडपणामुळे मी काहितरी बोलून जातो. कधी कधी ते अत्यंतिक विसंगत असतं आजकाल मी काय बोलतोय ते त्यांच्या नंतर लक्षात यई पण खुप वेळानंतर आणि त्या एकाचे ही अर्थ नंतर लागत नसत. त्यांच्या बोलण्यातही भयंकर विसंगती जाणवते. म्हणजेच लोक काय बोलत आहेत. आपण काय बोलतो याचा ताळमेळच राहत नाही त्यासाठी एक उदाहरण म्हणजे, ''सुर्य ग्रहणाच्यावेळी एकदा मी सुर्य झालो होतो. मध्ये चंद्र आड आला चंद्र म्हणजे लूना **Luna** ..... लूनाटिक **Lunatic** म्हणजे वेडा ! चंद्रवेडा !''[१३] या विवेचनावरुन गणेश चौधरी बोलत असताना आपणं काय बोलत आहे. याचे त्यांना विसर पडून ते दुसऱ्याच विषयाकडे भरकटत जात असल्याचे दिसून येते.

१९६८ सालच्या 'त्या' घटनेनंतर गणेश चौधरी मनाने सतत खचतच होते. प्रिय व्यक्तिंची केलेली हत्येची आठवण होऊन होणारा पश्चाताप आणि वाटणारी लाज आणि स्वत:लाच गोळ्या घालून घ्यावशा वाटणे? का कुठे डुबून मराव, गळफास लावून घ्यावा किंवा पेटवून घ्याव असे अनेक विचार त्यांच्या जाणिवांच्या अवस्थेत येत असत. गणेश चौधरींच्या बरोबर घरच्या व्यक्तींना ही १९६८ ते १९८० हा काळ दाहक ठरला. घरातल्या मंडळीची खचलेली मने, सामाजिक निंदानालस्ती, दुरदुरच्या न्यायालयामधले हेलपाटे. तुरुंगाच्या आणि मनोरुग्णालयांच्या वाऱ्या कर्जाचे वाढते डोंगर वेडेवाकडे हेलकावे घेणारी गणेश चौधरी यांची मनस्थिती आणि ढासळत जाणारी त्यांची प्रकृती, याची जाणीव दिसून येते. म्हणजेच 'नागवा' हे आत्मकथन द्विधा मनाचे रेखाटन आहे. आणि कालचक्रात अडकून हातून घडलेल्या गुन्ह्याचे त्यांना भोगाव्या लागणाऱ्या भोगाचे अत्यंत रोमहर्षक चित्रण आहे.

## गणेश चौधरींचे वेड :-

'नागवा' या आत्मकथनामध्ये गणेश चौधरींच्या वेडाची अनेक कारणे आहेत. त्यामध्ये मुख्य म्हणजे त्यांचे मन काचेचं आहे त्यांना अस वाटतं वस्तुत: तसे काही नाही नव्हतेच. तशा प्रकारचे भास/भ्रम/चक्कर हे त्यांचे वेड होते व त्यामुळे आपले विचार सर्वांना समजतात तसेच शब्दच्छल करत होते. यावरुन त्यांची मानसिक अवस्था स्पष्ट जाणवते.

या मानसिकतेची सुरुवात लहानपणीच झाली होती. पहिली घटना नोंदवतात, ती म्हणजे आपल्या व आईच्या मध्ये व आपल्यावरील प्रेमात दिवाकरच्या रुपाने एक वाटेकरु आला आहे. ह्या घटनेतून सर्व मुलांना जावे लागते. पण गणेश चौधरींच्या या भाबड्या मनाने त्यांची चिकित्सा केली आहे. या नंतर आपण एका प्रतिष्ठित वकिलाचा मुलगा असल्यामुळे आपण चांगले वागले पाहिजे नाहीतर लोक काय म्हणतील हे त्यांच्या मनावर लहानपणीच बिंबलेले होते. आणि त्यामध्ये त्यांचा व्यवसाय शिक्षकाचा असल्यामुळे आपल्या प्रिय विद्यार्थ्यांना काय वाटेल अशा भितीने त्यांनी आपल्या भावना दाबून ठेवलेल्या आहेत. त्यांच भावनाचा उद्रेक म्हणून ते मनातल्या मनात बोलत. ते सांगतात की, "लहानपणापासून मला न कळलेला हा शाप मला भोवला आणि मनात बालपणीचा रुजला तो एक विक्षिप्त गंड Complex. मी कितीतरी वेळा या गंडाशी स्वत:च त्रयस्थासारखा लढतोय! लोक मी, आणि गंड व शापित मन यातूनच पुढे विलक्षण ताण व नंतर वेड निर्माण झाले!!"[१४] या विवेचनावरुन गणेश चौधरींना ही आपला हा गंड आहे याची जाणीव झाली आहे. पण ही वादळानंतरची शांतता होती आणि त्यावेळी केलेला हा विचार होता. म्हणजेच मानवाचा गंडच त्याचा शत्रू असतो. हे यावरुन आपल्याला दिसून येते.

घरातील वातावरणाचा त्यांच्या मनावर परिणाम होत असे. घरात वडिलांच्या आजारपणामुळे कायम चिंतेचे वातावरण असे. आई सतत बाबांची काळजी करण्यात व शेतीची देखभाल करण्यात गुंतलेली असे. म्हणजेच लहानपणापासून आईच्या प्रेमाला पोरका झालेला आणि त्यामध्येच आई प्रमाणे प्रेम करणारी ताई जेव्हा मरण पावते. त्यावेळी त्यांना जाणवणारे एकटेपण, ह्या एकटेपणाचा मनावर झालेला आघात या छोट्या समजल्या जाणाऱ्या गोष्टीच त्यांच्या मनावर आघात करत गेल्यामूळे आणि त्यांची अवस्था कुणालाच न समजल्यामुळे त्यांच्या मानसिकतेत बदल झाला नाही. त्याचा परिणाम त्यांना आपल्या प्रिय व्यक्तींच्या हत्येने भोगावा लागलेला आहे. ते आपल्या मनाबद्दल लिहितात, "माझ्या नग्न मनाला', 'अनावृत्त मनाला', 'काचेच्या मनाला', 'कव्हर' 'आवरण' पाहिजे!! म्हणजेच माझ्या मनातील बरे वाईट माझे, 'तो' चे जाणिवेतील विचार कोणालाही कळता कामा नये जर चार चौघांसारखं 'आवृत मन' मला मिळाल....."[१५] या संदर्भावरुन या

सर्वाच्या पाठीमागे 'नग्न मन' हेच होत आणि या वेडाचं मूळ ही हेच असलेले दिसते. त्यांना आठवलेल्या लहानपणाच्या प्रसंगावरुन असे वाटते.

गणेश चौधरी यांच्या जीवनात वेगवेगळ्या टप्प्यात आलेल्या लहानपणापासूनच्या स्त्रीयांमध्ये सुमी, शकू, पमी या आल्या होत्या. यांचा उल्लेख प्रकरण ३, ८ व १५ यामध्ये झालेला आहे. या विषयी ते लिहितात की, "वयाच्या वाढत्या आणि महत्वपूर्ण अशा टप्प्यांवर या मुलींशी/ स्त्रियांशी जुळलेली मैत्री त्या टप्प्यांवर आनंददायक निश्चितच वाटली असेल, परंतू त्या बरोबरच सुसंस्काराची, आदर्शाची अट्टहासी ओढ यांची रस्सीखेच सुरु होऊन नैसर्गिक कामविकारांचे अकारण दमन झाले."[१६] या संदर्भावरुन गणेश चौधरींनी आपल्या मनाला भावनांना जाणिवेत असताना त्यांचे दमन केले. पण त्यामूळे त्यांच्या 'इड' हा वाढत गेला. आणि गणेश चौधरी वेडे झाले. अट्टाहासाने चांगले वागण्याचा त्यांच्या प्रयत्नामुळे त्यांच्यावर अनर्थ ओढवले होते हे दिसून येते. त्यांच्या जीवनात घडलेली दूसरी महत्त्वाची घटना ते प्रकरण ८ मध्ये नमुद करतात.

गणेश चौधरींच्या हे सर्व मनाचे खेळ होते ते सांगतात माझ्या इतकं प्रत्येक प्रसंगाचं वा स्वत:च कठोर आत्मपरिक्षण करणारा माणूस कुणी असेल अस मला वाटत नाही. ते सांगतात मी माझ्या पत्नीला सांगे 'हाळू बोल' कारण त्यांना वाटे आपले बोलने लोक ऐकत आहेत आणि नंतर या बोलण्यावरुन आपली थट्टा लोक करणार आणि आपल्यावर हसणार या विचाराने त्यांचा होणारा कोंडमारा येथे व्यक्त होतो. या त्यांच्या वागण्याचा त्यांनाच राग येई, संताप होई. आणि त्यामुळे शरीर दुर्बल आहे असं वाटत असे. आपली प्रकृती चांगली असताना उगाच असे वाटणे म्हणजे हे सर्व त्यांचे भ्रम-भास वेड होते. यांची जाणीव त्यांना तेव्हा झाली नाही. वेडाच्या अवस्थेत असताना त्यांच्या हातून झालेल्या कृत्याची आठवण झाल्यावर त्यांची मानसिक स्थिती ढासळत असे आणि मग सुरु होई त्यांची अव्यर्थ बडबड, त्यावेळी त्यांचे अव्यर्थ बोलणे ते सांगतात, "शेखर, सुसा, रवि... रक्त..... सुसा, सुसा मी मी हे काय केलं... किती वेळ गेला कुणास ठाऊक कुठेतरी 'टोल' पडत होते– मी भानावर आलो! मला मरण दे! मला मरण दे मी तुला शरण आहे..... हे देवा, शेखर, सुसा, रवि यांच्या आत्म्यास शांती दे आई, बाबा, भाऊ सर्वांना सुखी ठेव मला मरण दे मरण दे मरण दे.....!"[१७] या विवेचनावरुन विचारांची सुरुवात कुठून होते आणि कुठे

विचार संपतात त्यांचे त्यांना भान राहत नाही. आपण हा विचार का करतो आहे हे कश्यासाठी चालले आहे हे त्यांचे त्यांनाच समजत नाही यावरुन गणेश चौधरी यांच्या वेडाची प्रचीती आपल्याला येते असे वाटते.

पागलखान्यात चौधरी यांना कधी गेले यांची आठवण नाही. पण अखेरच्या रात्री विषयी ते लिहितात, त्या रात्री तिथले दिवस, कर्मचारी, सहकारी, तसेच वरिष्ठ डॉक्टर यांनी त्यांना दिलेली साथ, आधार त्यांची केलेली सेवा या सर्व आठवणी दाटून येतात. त्यांनी जीवनातील अनमोल व्यक्ती गमावलेल्या होत्या. पण त्या काळात त्यांच्या वाट्याला आलेल्या या वेडामध्ये घरच्यांची साथ होती. त्या बरोबर त्यांना या मनोरुग्णालयाने दिलेली माया ते विसरले नाहीत. या आपल्या स्वत:च्या या आयुष्याविषयी लिहितात, ''रेड्याशी भांडता येते, गेंड्याशी झुंझता येते, स्वत:शी लढावं कसं?... उभ्या आयुष्यात कुणी आपला शत्रु नव्हता, नाही..... अन् कदाचित पुढेही नसेल......!

छे! हे खोट आहे! माझा एकच शत्रु आहे ! मीच!''[१८]या विवेचनावरुन त्यांना समजले होते की त्यांचे मनच त्यांचा शत्रु होते. या वरुन आधुनिक युगामध्ये मनोवैज्ञानिकांना सुद्धा समजले नाही. मानवाच्या सतप्रवृत्ती व विकृत प्रवृत्ती पाठीमागे त्यांचे मन आहे असे वाटते. गणेश चौधरी यांचे हे विचार नेणीवेतून जाणीवेत आल्यानंतरचे आहेत त्यांना हे मनाचे खेळ समजतात, शब्दांची चाललेली चिरफाड, विचार करणे हे सर्व निरर्थक आहे.

पागलखान्यात असताना त्यांना भ्रम/भास होत आपल्यावर कोणीतरी मोठमोठ्योन हसत आहे त्यावरुन त्यांचे विकृत, विभत्स बोलणे, निरर्थक विचाराची चाललेले अखंड खेळ असत. तसेच त्यांच्या मनातील शब्दांची आकडे-मोडचालत असे. या पाटीमागचे कारण म्हणजे त्यांचा एकटेपणा ही आणि विचारांचे अखंड मंथन आहे. ते आपल्या या अवस्थे संदर्भात सांगतात की,''या प्रदिर्घ एकांतवासामुळे मी कधी मनातल्या मनात तर कधी मोठ्यानं न कळत बोलत असतो.... अन् आता तर विचार करण्याची देखील भिती वाटते! विचार करण्याची भिती। फार भयंकर कौर्य आहे हे..... निर्दय नियतीनं माझी केलेली जिवन्त शिकार आहे ही......स्थित प्रज्ञासारख्या सरळ निर्मळ विचारांची भिती...... अज्ञ माणसाच्या पायात पाय अडकून कोलमडणाऱ्या विचारांची भिती तर सामान्य

माणसाच्या स्वाभाविक विचारांची भिती''[१९] या संदर्भावरुन मानवाच्या असलेल्या सुप्त जाणीवेचा प्रत्यय येतो. येथे सामान्यपणे विचार करताना गणेश चौधरींना वाटलेली भिती दिसून येते. येथे मन हे वादळाप्रमाणे धावत असते. त्या वादळामुळे मात्र त्याचा संसार मोडला गेला होता. त्यांनी आता कितीही मनाभोवती तट बांधले तरी ते उधळून कोसळून त्यामध्ये हे विचारांचे वादळ शिरतच होते. म्हणजेच कापूस पिंजावा तसे विचार अखंड पिंजले जात आणि लोक आपले विचार जाणत आहेत असा संशय त्यांना वाटणे हे त्यांच्या वाहवत चाललेल्या मनाची अवस्था होती.

'मनी असे ते स्वप्नी दिसे' या म्हणी प्रमाणे मानसशास्त्रज्ञाने केलेल्या संशोधनावरुन सामान्यपणे मानवाच्या मनामध्ये जे विचार चाललेले असतात. तेच त्याला त्यांच्या आवती–भोवती दिसते हे सर्व त्यांना होणारे भास असतात. यामुळेच एक विचाराचे चक्र निर्माण झाले होते. यातूनच वेड वाढत जाते जे सामान्य माणसांना दिसत नाही. ते त्यांना दिसत असते हेच गणेश चौधरींच्या बाबातीत घडले. त्यांनी आपली ही स्थिती आपल्या नातेवाईकांना सांगितली. पण त्यांच्यावरती कोणी विश्वास ठेवला नाही. काही माणसांचे जन्मच मुळी व्यथा, वेदना भोगण्यासाठी असतात. गणेश चौधरी हे कवी याच जातकुळातले व अपराधी मनोरुग्ण होते. येथे चौधरींच्या वेडे होण्यापाठीमागे आणखी एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे, "वयानुपरत्वे वाढत्या शरीराच्या विकासाबरोबर सदोष मेंदूचीही वाढ होणे अपरिहार्य होते. गणेश चौधरी यांचे वेडही त्याबरोबर वाढले वेड वाढण्याच्या या प्रक्रियेला कारणीभूत बाबीही त्यांच्या साहित्यातून प्राप्त होतात. मात्र, 'त्या दडलेल्या; त्यांच्या नकळत लिहिलेल्या अढळतात. घटनेच्या आगेमागे वाढलेल्या रोगलक्षणांचीही प्राथमिक रुपे होत.''[२०] या संदर्भावरुन गणेश चौधरींच्या वयानुसार त्यांचे वेड वाढले आणि त्यामध्ये त्यांनी लेखन केले ते त्यांच्यासाठी उपचार म्हणून केले गेले होते. पण त्यातून चांगले साहित्य निर्माण झाले. पण त्याच्यामधून काही विकृत लेखन आलेले दिसून येते. यावरुन त्यांच्या मनासिक स्थितीची जाणीव होते.

गणेश चौधरींची मानसिक अवस्था आणि त्यातून दिसून येणारे गणेश चौधरींचे व्यक्तिमत्त्व आपल्याला दिसून येते. येथे त्यांनी एक चांगला मुलगा, एक पती व शिक्षक होण्यासाठी प्रयत्न केला. त्यांच्या नग्न मनाने किंवा त्यांना होणारे भास, भ्रम आणि लोकांची

वाटणारी भिती यामुळे त्यांची झालेली वाताहात दिसून येते. प्रत्येक प्रसंगातून गणेश चौधरी यांची मानसिक स्थिती आपल्याला दिसून येते. या अवस्थेकडे झालेले दुर्लक्ष, त्यातून वाढत गेलेले वेड आपल्याला 'नागवा' या आत्मकथनामध्ये दिसून येते.

## 'नागवा' या आत्मकथनातील विविध व्यक्तिरेखा :-

'नागवा' या आत्मकथनामध्ये गणेश चौधरी लिहित असताना त्यांनी आपल्या जवळच्या व्यक्तिंची रेखाटन रेखाटतात. या प्रवाहामध्ये वाहत असताना त्यांना आधार देण्याचे, त्यांना सावरण्यासाठी व मानसिक आधार देण्याचे काम करतात? गणेश चौधरी यांनी आपल्या वडिलांच्या स्वभावाचे त्यांच्या शिस्तीचे आणि प्रेमळपणाचे वर्णन करताना ते सांगतात. त्यांचा व्यवसाय वकिलीचा होता. त्यामुळे ते त्यांच्या कामात सतत गुंतलेले असले तरी आपले कर्तव्य ते चोख बजावत होते. जेव्हा मध्यंतरीच्या काळात आजारी पडतात त्यावेळी त्यांच्या वागण्यात बदल होतो. निद्रानाशामुळे ते सतत अस्वस्थ होते. नंतर काळ निघून गेला ते थकले असले तरी त्यांच्या स्वभावातील करारीपणा आणि वागण्यात बदल झालेला नाही असे ते सांगतात. त्यांच्या विषयी ते सांगतात त्यांना कुणीही दुरुत्तर केलेले त्यांनी पाहिलेले नाही. आपल्या वडिलांच्या विषयी ते लिहितात, "आज ते थकले आहेत. ते चुकून देखील तसं बोलले नाहीत. तरी मला माहित आहे, त्यांना दमविलंय मी! त्यांच्या प्रचंड प्रवाही जीवनात माझ्यामुळे संथ डोह निर्माण झाले, याची मला खंत वाटते! एक धगधगता रसरसता ज्वालामुखी थंडगार हिमनगात रुपांतरीत व्हावा याचं मला फार दुःख होतं."[२१] या विवेचनावरुन गणेश चौधरी यांना वाटते आपल्यामुळे आपल्या वडिलांना मानहानी सहन करावी लागली त्यांना दुःख झाल्याची जाणीव त्यांना आहे. तसेच सांगतात ईश्वरनिष्ठेविषयी त्यांच्या मनात शंका आहे. पण पितृभक्तीविषयी त्यांना कोणतीच शंका नाही. म्हणजे आपल्या वडिलांच्याविषयी त्यांच्या मनात असलेला आदर समर्थपणे येथे व्यक्त करतात.

गणेश चौधरी जसे पितृभक्त आहेत त्याप्रमाणे ते मातृभक्त आहेत. लहानपणापासून त्यांच्या मनामध्ये आईविषयी असलेला आदर व प्रेम व्यक्त होतो. लहापणी भाऊ झाल्यामुळे आपल्यावरचे आईचे प्रेम कमी होणार नाही ना? तसेच आईच्या आठवणीने रात्रीचे रडणारे

चौधरी आईला करावे लागणारे कष्ट, त्यांचीही त्यांना जाणीव आहे. बाबा आजारी असल्यामुळे तीला शेतीची कामे व घर या दोन्हीकडे लक्ष द्यावे लागत होते. आपल्या मुलांच्या वरती चांगले संस्कार घडावे. त्यांनी चांगले शिकून मोठे व्हावे म्हणून त्यांना आपल्यापासून लांब शहराच्या शाळेत पाठवले होते. त्याचप्रमाणे साधू महाराज घरी येतात. त्यावेळी प्रथमच आईच्या चेहऱ्यावर स्मित हास्य आले होते. संसाराचा गाडा ओढून त्या खचल्या होत्या. तरीही सर्व आनंदाने करत होत्या. मुलांच्या भविष्याच्या चिंतेच्या खातेर त्या साधु आजोबांना मुलांचे हात पहाण्यास सांगतात. त्या साधू महाराजांनी काशीला जाण्याआगोदर त्यांच्या बाबतीत केलेली भविष्ये सत्य निघाली होती. मुलगी वारली त्यावेळी सुद्धा त्या मनमोकळेपणाने रडू शकल्या नाहीत. आजपर्यंत त्या सतत मन मारुन जगल्या होत्या. त्यांनी सुख कधी पाहिल नाही. सतत संसार करताना आपल्या मुला-बाळांचा त्या विचार करत असलेल्या दिसतात.

गणेश चौधरींच्यावर आईप्रमाणे प्रेम करणारी ताई होती. त्यांनी ताईची व्यक्तीरेखा अत्यंत रेखीवपणे रेखाटन केली आहे. आईच्या पाठीमागे घरचे सर्व काम करुन ती अभ्यास करत असे. एकदा रात्री चौधरी रडत होते त्यांना आईच्या मायेने समजाऊन त्यांना थोपटत होत्या. त्यांचप्रमाणे जेव्हा त्यांच्या पायाला खिळा लागतो तेव्हा आपले दु:ख झाकून ठेवून त्या काम करण्यामध्ये गुंतलेल्या होत्या. ज्यावेळी त्यांचा मृत्यु होतो. त्यावेळी चौधरींच्या स्वप्नात जातात. म्हणजेच फक्त त्यांनी बहिण म्हणून त्यांनी आपल कर्तव्य पूर्ण केले पण त्याबरोबर त्यांनी आपल्या लहाणभावावर केलेल्या मायेचा प्रत्यय येथे येतो.

'नागवा' या आत्मकथनामध्ये त्यांच्या जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर स्त्रिया आल्या आहेत. पण यामध्ये त्यांची पत्नी या व्यक्तिरेखेचे वेगळेपण दिसून येते. त्यांच्या जीवनात आलेली अनेक वादळे त्यातून स्वत:ला आणि पतीला सावरत असताना त्यांची झालेली ससेहोलपट येथे येते. त्यांच्या बद्दल ऐवढेच म्हणता येईल 'स्त्री जन्म तुझी कहाणी' त्याप्रमाणे त्यांच्या जीवनात पतीला लागलेले वेड, त्यांना होणारा भास, भ्रम आणि त्यातून त्यांना समजून घेऊन त्यांना शांत राहण्यास सांगत होत्या. तेव्हा त्यांना येणारा संताप, पण संतापाला आवर घालून लहाण मुलाप्रमाणे समजूत घालत. त्यांना होणारे भ्रम याची सतत जाणीव करुन देत असत. पतीची मानसिक अवस्था समजून घेऊन त्यांच्याबरोबर धैर्याने

संसार करत होती. शेवटी तिच्या ही वाट्याला आलेले वाईट मरण ही शोकांतिकाच म्हणावी लागेल. एक स्त्री आपल्या नवऱ्यासाठी सर्व काही विसरुन त्यांच्या सुखात-दु:खात त्याला साथ देत असते आणि हेच त्यांनी केले होते. येथे त्यांनी रेखाटन केलेल्या आईची व पत्नीची व्यक्तिरेखा मध्ये सारखेपणा जाणवतो. एक स्त्री म्हणून आपल्या कुटुंबाविषयी करत असलेले कर्तव्य, ते ही कोणतीही तक्रार न करता. येथे गणेश चौधरींची आई आणि पत्नी यांनी आपल्या नवऱ्यासाठी किंवा पतीच्या सेवेसाठी आपले आयुष्य खर्च केले. स्त्री ही सहनशील असते. तिला त्यागाची मुर्ती बनविली आहे. पण जेव्हा वेडाच्या भरात गणेश चौधरी आपल्या बायकोवर करत असलेला अन्याय त्यांनी निमुटपणे सहन केला आहे. म्हणजे कुठेतरी या स्त्री व्यक्तिरेखाच्या मध्ये अन्याय होत आहे हे समजते. पण तो सहन करणे हे नशिब मानून त्या जगताना दिसतात. प्रकरण तीनमध्ये पौगंडावस्था असताना ते सुमी विषयी लिहितात. सुमी त्यांची चुलत बहिण होती दिसायला सुरेख होती. त्यांची सुमीची मैत्री जमली होती. लहानगटात ती होती त्यामुळे ती चौधरींबरोबर होती. येथे लहाणपणी त्यांच्यामध्ये निर्माण झालेली जवळिक होती. त्याचप्रमाणे तारुण्यावस्था मध्ये शकु विषयी लिहितात येथे शकूवरुन त्यांचे सहकारी त्यांची चेष्टा करत त्यांच्या मनात असलेले शकूचे विचार याविषयी ते लिहितात. तर प्रौढपूर्व तारुण्यावस्थामधील पमी याची व्यक्तिरेखा चौधरी करतात. या जीवनाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर आलेल्या स्त्रीयांशी त्यांचे असलेले वेगळे भाव विश्व आहे. पण यामध्ये त्यांच्या मनाने गुंता केलेला आहे.

पागलखाण्यात असताना तिथल्या कर्मचाऱ्यांनी त्यांना लावलेली माया, प्रेम यामध्ये भोलेजी आणि मधु याचे वेगळेपण चौधरी नोंदवत आहेत. भालेजींनी गणेश चौधरींना स्वत: जेवण भरवले होते. त्यांची ज्यावेळी संध्याकाळची ड्युटी असे त्यावेळी त्यांच्यात चाललेले बोलणे ते सांगतात. पागलखाण्यातील शेवटच्या रात्री जेव्हा चौधरी जागे होते त्यांना झोपी येत नाही त्यावेळी जीवणाचे तत्वज्ञान सांगतात, सारखा खुशीत असणारा दुसऱ्याच्या सुख–दु:खात सहभागी होणारा आणि प्रेमाने पटेलसाब म्हणून आवाज देणारा मधू होता. त्याचप्रमाणे भालोजी वयाने मोठे असले तरी चौधरींच्याबद्दल त्याच्या मनामध्ये आदर होता. तेव्हा चौधरी त्याच्या पाया पडतात. त्यावेळी प्रेमाने भेटले आणि आशीर्वाद दिला. मनोरुग्णालयात गेल्यावर त्यांना प्रेमाने जेवू घालणारे भालोजी होते. येथे पागलखाण्यात

असणारे डॉक्टर, इतर कर्मचारी वर्गाबरोबर त्यांना आठवण होती ते पागलखाण्यातील प्रत्येक व्यक्तींचीची व्यक्तिरेखा रेखाटताना गणेश चौधरींनी प्रत्येक व्यक्तिच्या स्वभाव, गुण, दोषाचे वर्णन करतात. पण त्या बरोबर तेवढे मनापासून प्रेम ही ते करतात. येथे आलेल्या व्यक्तिरेखा ह्या गणेश चौधरींच्या जीवन प्रवाहत त्यांना आदर देणाऱ्या सावरणाऱ्या आहेत. इथे जरी ताई जीवनातील प्रेम घेऊन गेली. बाबा जरी कर्तव्य दक्ष होते, आई शेतात होती. तरी या व्यक्तिनी चौधरींच्या जीवनात त्यांना सावरुन घेऊन त्यांना जगण्याचा मार्ग दाखविला आणि या व्यक्ति रेखांनी या आत्मकथनात एक वेगळेपण सिद्ध केलेले आहे.

## भाषिक विशेष :-

गणेश चौधरींच्या 'नागवा' या आत्मकथनाच्या भाषेचा विचार करत असताना त्यांचे कलात्मक लेखना विषयक जाणीव उत्तम प्रकारची आहे. आपल्या दु:खाला शब्दांचे कलात्मकरुप प्राप्त करुन देण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखणीत आहे. 'संवेदनशील मनाचा कवी' यांचे हे आत्मकथन आहे असे 'नागवा' वाचत असताना सतत भाषेचे ही सामर्थ्य जाणवते. यामध्ये सर्व निवेदक एका प्रौढ, सुसंस्कारीत भाषेत केलेले आढळते. या आत्मकथनातून येणाऱ्या व्यक्ती जळगांव जिल्ह्याच्या आसपासच्या परिसरातील आहेत. त्यामुळे त्या परिसराच्या बोली भाषेचा प्रभाव जाणवतो. ग्रामीण, शहरी व हिंदीभाषेचा प्रभाव जाणवतो. उदा : 'अगदी चारी मुंड्या चीत!, 'अन्नाला जागला नाही', 'वडाची साल पिंपळाला असं होणारचं!', 'आपलं थडगं आपणच खोदायचं अन् एखाद्या जीवशांस्त्रज्ञाच्या नजरेचं पहायचं!', 'राजा म्हणा की रंक म्हणा आत्मकथेत हेच करीत आले आहेत!', 'सत्यवती लेखणीला', 'त्रस्त समंधा शांत हो।', 'घोड्यासारखे केस' इत्यादी वाक्यप्रयोगामुळे वातावरणातील प्रत्ययकारीता या आत्मकथनातून दिसून येते.

यातील वाक्यप्रयोगाप्रमाणेच काही शब्दकळाही आवर्जुन बघण्यासारखे आहेत. यामध्ये हिंदी व इंग्रजी शब्दांचा प्रभाव आहे. उदा : सर्वा, दुधदुभतं, हेकट, एककल्ली, बुळेपणा, खिलवला, लेकाना, अनुचर, हरामखोर, पगलट, रुपड, बडंथा, टकळी, ब्याद, तिंबत, कालदी, गैऱ्ह्या, आठी, कितलं, उसरी कावरबेल इ. तसेच इंग्रजी शब्द येतात. उदा

: रिगींग, इन, डिस्कशन, बॅडमिंटन, डिस्टर्ब, ट्रेनिंग, बेसिक, ट्रंडा, ब्रदर, नॉन्सेन्स, गेट आऊट!, रिझल्टस्, प्रॅक्टीकल, ड्युटी, ओव्हरसियर, कॉम्प्लेक्स, ल्युर्नेटिक, प्लीज, ॲडमीट, शटअप्, ब्लडी, लाऊड स्पीकर इ. हे असे संमिश्र शब्द आलेले आहेत. म्हणजेच या आत्मकथांवर तीन्ही भाषांचा प्रभाव असलेला जाणवतो.

'नागवा' हे आत्मकथन वाचताना वाचकांच्या मनात वाचनाची उत्सुकता वाढते त्याचबरोबर हूरहूर ही वाढते. या संपूर्ण आत्मकथनात गणेश चौधरी आपले अनुभव सांगताना दिसतात. त्यांना यातून कोणत्याच प्रकारची सहानभूती नको आहे. या आत्मकथनात त्यांनी आठवणी आठवल्या तशा सांगितल्या आहेत. हे आत्मकथन वाचल्यानंतर वाचकाच्या मनात कोलाहल माजवण्याची ताकत, सामर्थ्य गणेश चौधरींच्या लेखणीत आहे. त्यांनी मनोरुग्णांसाठी लेखणी हे शस्त्र वापरुन उपचार करण्याचा ते प्रयत्न करतात. या आत्मकथनात शब्दांचे निखारे वापरतात. ते मनोवैज्ञानिकांना यांचा उपयोग होऊन उपचार करता यावा म्हणून हे आत्मकथन ज्यांना अशा आजाराने ग्रासले आहे अशा व्यक्तिंसाठी संजीवनी ठरावी म्हणून लेखन केले आहे. हे आत्मकथनातील लेखन मनोवैज्ञानिकांसाठी आव्हान ठरावे म्हणून केलेले आहे.

गणेश चौधरी यांनी या आत्मकथनात वापरलेली भाषा साधी, सोपी, सरळ व ओघावती आहे. साहित्यात एक वेगळा विषय या कलाकृतीने मांडला आहे. येथे वास्तव मांडले आहे तसेच धगधगते जीवन चित्रित केले आहे. एक साहित्यकृती म्हणून श्रेष्ठ तर आहे पण ललित वाङ्मयात वेगळा मानदंड मांडलेला आहे. येथे सामान्य माणसाच्या दु:खापेक्षा वेगळेच दु:ख मांडलेले आहे. येथे वाचकांचा मनोरुग्णांकडे बघण्याच्या दृष्टीकोनात निश्चितच बदल घडवून आणण्याचे व अंतर्मुख करण्याचे काम या आत्मकथनाने केले आहे.

## साहित्यिक विशेष :-

साहित्य म्हणजे सत्य, शिवं व सुंदरम यांचा चित्तवेधक संगमच असतो. ललित साहित्यामध्ये या सर्व मूल्यांचा विचार केला जातो. या संपूर्ण कसोट्या 'नागवा' हे आत्मकथनानेपार केलेल्या आहेत. या कलाकृतींचा विचार करत असताना यामध्ये

जाणवणारे साहित्यिक विशेष म्हणजे अलंकार, उदाहरणे, विशेषणे तसेच जळगांव जिल्ह्यातील बोलीभाषेचा प्रभाव जाणवतो. त्याचप्रमाणे इंग्रजी वाक्ये आणि हिंदी संवादही यामध्ये आलेले आहेत. जेव्हा कलाकृती निर्माण होते. त्यावेळी येथे साहित्यातील विविध प्रवाह येतात. त्याचबरोबर वातावरणाचा व समाजाचा त्यावरती प्रभाव असलेला दिसतो.

'नागवा' या आत्मकथनात गणेश चौधरींनी अनेक ठिकाणी अलंकारीक भाषेचा वापर केला आहे. उदा :- 'आकाशात चांदण्या फुलल्यागत वाटत होत्या', 'उठता बसता म्हतारीची हाडं अन् बोटं कडकडत मोडतील; तशी वारा गेलेल्या पह्याटीची गत!', 'माझ्या मुर्गीला दोन टांगांच नाही', 'संथ जलाशयातील सूर्यबिंब', 'और हमे भी अंजान राहपर चलना है।', 'गझल सौन्दर्य दर्दमें होता है' इ. वाक्य आली आहेत. त्याचबरोबर काही ठिकाणी गझल झालेल्या आहेत. त्यातील एक गझल उदा : - ''रुक जाओ सुबह तक न हो ये रात आखरी

शायद न हो तेरी मुलाकात आखरी.....''[२२]

गझल प्रमाणे इंग्रजी वाक्याचा वापर आलेला आहे. 'WISH YOU BEST OF LUCK.' ' TO BE OR NOT TO BE' या सारखी वाक्ये वापरतात. अशा अनेक वाक्य अलंकार, गझल यांचा वापर करुन त्यांनी आत्मकथन संपन्न/समृद्ध केले आहे. त्यांनी लेखन करत असताना साहित्यातील अनेक व्याकरण पद्धतीचा उपयोग केला आहे.

गणेश चौधरींच्या आत्मकथनात वेगळेपण जाणवते. ते त्यांनी दिलेल्या अनेक उदाहरणांवरुन. त्यांनी ऐतिहासिक, पाश्चिमात्य साहित्यिक तसेच साध्या रोजच्या जीवनातील उदाहरण देतात. वेदांन्तातील विख्यात उदाहरण साप आणि दोरीचं देतात, त्याचप्रमाणे मातीत उमललेले फुल मातीसकट उचलावं लागत मातीत मिसळण्यापूर्वी।' यानंतर ते ऐतिहासिक उदाहरण देतात ते पृथ्वीराजा व महंमद घोरी यांचे देतात. त्यानंतर गणेश चौधरी म्हणतात माझा पूर्ण हॅम्लेट झालेला आहे अशी अनेक उदाहरण ते देतात. म्हणजे आत्मकथनात संपन्नता येण्यासाठी या वाक्यांचा उपयोग होतो तसेच अनेक ठिकाणी ग्रामीन शिव्या आलेल्या आहेत. तसेच अश्लिल भाषा ही आलेली आहे. उदा : - ''हा गांडू म्हणतोस बाहेर ये! जणू काही बाहेर साल्याच्या बापाचं राज्या आहे. मादरचोद साला. मी काय त्याच्या मायची फोदरी मारणार आहे की त्याच्या बापाची गांड! काय करीन

हा साला भोसडीचा? जीव घेईन! ती पर्वा मला नाही! किंवा जास्तीत जास्त मला मारहाण करुन माझी कातडी सोलेन, इज्जतीच्या चिंध्या उडवील.''[२३]

'नागवा' या आत्मकथनावर ग्रामीण भाषेचा प्रभाव आहे. त्याचबरोबर गणेश चौधरींच्या मनोरुग्णतेचा प्रभाव ही दिसून येतो. या साहित्यकृतीचे वाचन करताना वाचकांना येणाऱ्या वेगळ्या भाषेचा अनुभव येतो. येथे लेखकाने अनेक काळातील उदाहरण देतात या उदाहरणावरुन गणेश चौधरींच्या व्यासंगाचा अनुभव येतो. त्याचप्रमाणे हे आत्मकथन मनोरुग्णाने जाणीवेत आल्यावर आपल्या भूतकाळातील नेणिवेचे लेखन केलेले पाहून वाचकाला त्यामागचे कुतूहल निर्माण होते. वाचकांची उत्कंठा उंचावलेली दिसून येते.

## तज्ज्ञांची मते :-

'नागवा'या आत्मकथनाने साहित्यात वेगळा विषय मांडून एक वेगळी वाट निर्माण केलेली आहे. यावरती अनेक तज्ज्ञ आपली वेगवेगळी मते व्यक्त करतात. यामध्ये त्यांचे जवळचे मित्र, नातेवाईकही आहेत. यामध्ये प्रथमता ''नागवा' या पुस्तकाचे लेखन कै. गणेश चौधरी यांच्या संदर्भात मराठी साहित्यात बरेच काही चर्चिले आहे. त्यांच्या लेखनाबाबतीतले कुतूहल हे थेट त्यांच्या जीवनाशी वाचकाला नेत असल्याने तर 'कै. गणेश चौधरी' या व्यक्तीविषयीही अधिक उत्सुकता निर्माण होणे स्वाभाविक आहे.''[२४] वा. रा. सोनार यांना गणेश चौधरींच्या लेखन व जीवनाविषयी कुतूहल निर्माण झाले होते. तर डॉ. रवींद्र भास्करराव पाटील असे सांगतात की, ''नागवा' आत्मकथन असले तरी लेखकाच्या त्या त्या क्षणावेळची मन:स्थिती आणि भूत वा वर्तमान ज्या काळातील जे लिहावेसे वाटते ते त्यांनी प्रकरणश: येथे लिहिले आहे. गणेश चौधरी यांच्या 'मनोदुभंगतेच्या खुणांचा भूतकालीन मागोवा' या पुस्तकात/आत्मकथनात जागोजागी पहावयास मिळतो.''[२५] डॉ. रवींद्र पाटील यांनी मांडलेल्या मतावरुन गणेश चौधरींच्या भूतकाळातील मनोदुभंगतेच्या खुणा त्यांनी जाणीवेत आल्यानंतर सांगताना दिसतात.

गणेश चौधरींच्या वेडाविषयी अनेक तज्ज्ञांनी आपली मते व्यक्त केली आहेत. येथे घारे सांगतात की, ''अपराधीपणाची भावना आणि हीनगंड हत्येच्या मुळाशी असावेत. आपले अध:पतन पाहून पत्नी व मुले विध्द होतील. त्यांच्यावर ती पाळी येऊ नये म्हणून

चौधरींनी त्यांना मारले अशी कारणपरंपरा हत्येमागे लावतात.''[२६] येथे घारेंनी केलेल्या विवेचना वरुन प्रत्येक व्यक्तिच्या मनातील इड, इगो, सुपर इगो असतो. त्याचे रुपांतर हीनगंडात होते. त्यामुळे माणूस विचित्र विचार करतो हेच गणेश चौधरींनी केलेला आहे असे वाटते. माडखोलकर आणि महाजन हे दोघेही आपले मत व्यक्त करतात, ''तीव्र भावावेगी भावसंवेगी व्यक्तिमत्त्व' म्हणून गणेश चौधरी त्यांच्याबद्दल उद्‌गार काढलेले दिसतात.''[२७] या चौधरींच्या विषयी केलेले विवेचन अत्यंत सार्थ आहे. एक संवेदन मनाचे ते कवी होते. त्याचप्रमाणे हळवे, भाववेगी व्यक्तिमत्व असलेले दिसून येते. डॉ. य. वा. केळकर गणेश चौधरींच्या विषयी लिहितात की, ''त्यांच्या हट्टीपणांचा अनुभव मी पण घेतलेला आहे. कधी विकृत विचार, कधी विक्षिप्त वागणूक, कधी विलक्षण मागणी या सर्वांवर मात करण्यासाठी उपचारांचे बरेच शॉक्स त्यांनी व कळत नकळत मी ही सहन केले आहेत.''[२८] या संदर्भावरुन गणेश चौधरी यांच्या स्वभावाचा प्रत्यय येतो. त्याचबरोबर त्यांना देण्यात येणारा शॉकचा उपचार यांचे दु:ख त्यांना सहन करावे लागलेले आहे.

गणेश चौधरी यांच्या 'नागवा' या आत्मकथनाबद्दल अनेक तज्ज्ञांनी मते व्यक्त करताना काही विरोधी, काही चांगली मते व्यक्त केलेली आहेत. येथे कोणती ही साहित्यकृतीची समीक्षा होते त्यावेळी अनेक वाद निर्माण होतात. हे 'नागवा' आत्मकथनाच्या संदर्भातही घडलेले आहे. येथे गणेश चौधरींना वेड का लागले? या वेडाच्या भारात त्यांनी आपली पत्नी व तीन मुले यांची हत्या का केली? या वेडातून त्यांना एकाएकी जाग कशी आली? असे अनेक प्रश्न तज्ज्ञांना होते. म्हणजेच 'नागवा' ही साहित्यकृतीचे प्रत्येक तज्ज्ञव्यक्तीने समीक्षा मांडलेली आहेत. आणि साहित्यमध्ये ही कलाकृती आपले वेगळे भावविश्व निर्माण करते आणि वाचकाला विचार करण्यास प्रवृत्त करताना दिसते आहे.

## समारोप :-

'नागवा' या आत्मकथनातून दु:खाच्या जगदूव्याळ अनुभूतीनं कातडी सोलपटलेली, होरपळलेली माणसं जेव्हा नंतर पुन्हा लेखणी उचलतात तेव्हा अक्षरसाहित्यातील चिरकालीन सौंदर्यस्थळ उभारली जातात. म्हणजेच साहित्याच्या क्षेत्रात

क्रांती केलेल्या या आत्मकथनाने जीवनाचा एक वेगळा अनुभव गणेश चौधरींनी मांडला आहे. काचेच्या मनाच्या भोवऱ्यात अडकलेल्या व्यक्तिची करुन कहाणी अत्यंत पारदर्शक रितीने मांडलेली आहे. त्याचप्रमाणे आशावादी दृष्टीकोन ठेवून आपले जीवन जगतात. हे प्रशंसनीय वाटते तसेच कुठेही भाषेचा फुलोरा न करता, कल्पनांचे फुगे यांचा वापर न करता संथ वास्तवाभिमुख अशा साध्या लेखन शैलीतून हे आत्मकथन अवतरले आहे. हे आपल्याला अनुभवयास मिळते. या वैशिष्ठ्यामुळे 'नागवा' हे आत्मकथन साहित्याच्या क्षेत्रात मानदंड ठरले आहे.

## * संदर्भ सूची *


१) 'नागवा' - गणेश चौधरी, चेतश्री प्रकाशन, प्रथमावृत्ती, १५ ऑगस्ट १९८७, पृष्ठ - कवडसा

२) 'आकांक्षा' - संपादक अरुण सबाने, वर्ष ६, अंक ८, सप्टेंबर - ऑक्टोबर २००४, पृष्ठ २७

३) मंथन - (लोकमत) रविवार दिनांक १२ सप्टेंबर २००४, पृष्ठ ४ (गणेश चौधरी व्यक्ती आणि वाङ्मय)

४) 'नागवा' - गणेश चौधरी, चेतश्री प्रकाशन, प्रथमावृत्ती, १५ ऑगस्ट १९८७, पृष्ठ - कवडसा

५) तत्रैव - पृष्ठ ३

६) मंथन - (गणेश चौधरी : एक अध्ययन) दि. २६ सप्टेंबर २००४, पृष्ठ ४

७) 'नागवा' - गणेश चौधरी, चेतश्री प्रकाशन, प्रथमावृत्ती, १५ ऑगस्ट १९८७, पृष्ठ २६

८) लोकमत - 'मंथन' (गणेश चौधरी : अपूर्व मात्र पुरेपूर दुदैवी लेखन) दिनांक १० ऑक्टोबर २००४, रविवार, पृष्ठ ७

९) 'नागवा' - गणेश चौधरी, चेतश्री प्रकाशन, प्रथमावृत्ती, १५ ऑगस्ट १९८७, पृष्ठ - ४८ ते ४९

१०) तत्रैव - पृष्ठ ५८

११) तत्रैव - पृष्ठ ६८

१२) तत्रैव - पृष्ठ ७६

१३) तत्रैव - पृष्ठ ८६

१४) तत्रैव - पृष्ठ ६२

१५) 'आकांक्षा' - (आकांत - हृदस्थ भ्रात्यास पत्र) सप्टेंबर, ऑक्टोंबर २००४, पृष्ठ ६३

१६) लोकमत (मंथन) गणेश चौधरी अपूर्व मात्र पुरेपूर दुदैवी लेखन : रविवार दिनांक १० ऑक्टोबर २००४, पृष्ठ ७

१७) 'नागवा' - गणेश चौधरी, चेतश्री प्रकाशन, प्रथमावृत्ती, १५ ऑगस्ट १९८७, पृष्ठ - ५७ ते ५८

१८) तत्रैव - पृष्ठ ८८

१९) तत्रैव - पृष्ठ २५ ते २६

२०) लोकमत (मंथन) गणेश चौधरी अपूर्व मात्र पुरेपूर दुदैवी लेखन : रविवार दिनांक १० ऑक्टोबर २००४, पृष्ठ ७

२१) 'नागवा' - गणेश चौधरी, चेतश्री प्रकाशन, प्रथमावृत्ती, १५ ऑगस्ट १९८७, पृष्ठ - ८

२२) तत्रैव - पृष्ठ ७७

२३) तत्रैव - पृष्ठ १०० ते १०१

२४) तत्रैव - पृष्ठ कवडसा

२५) लोकमत (मंथन) गणेश चौधरी एक अध्ययन : रविवार दिनांक २६ सप्टेंबर २००४, पृष्ठ ४

२६) लोकमत (मंथन) रविवार, दिनांक १९ सप्टेंबर २००४, पृष्ठ ४, (गणेश चौधरी - पुर्वसुरींच्या समीक्षेचा तौलनीक विचार)

२७) तत्रैव - पृष्ठ ४ (लोकमत - मंथन)

२८) लोकमत (मंथन) : गणेश चौधरी व्यक्ती आणि वाङ्मय, रविवार दिनांक १२ सप्टेंबर २००४, पृष्ठ ४